महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोना न. ०२२-२४०९३११०
०२२-२४०३१४९८
फॅक्स नं.०२२-२४०९३११०
www.cpfmseb.२०११@gmail.com
website :www.mahadiscom.in

एस्टेला बॅटरोज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मंुबई ४०० ०१९.

क्र.लेवि/भनिनि/अं.प्र.ग/ ० \1237 दिनांक : 29 JAN 2018

**परिपत्रक क्रं.२११**

**विषय**:- भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाची प्रकरणे तसेच कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५ चे निवृत्ती वेतन प्रस्ताव तातडीने भनिनि कार्यालय धारावी येथे पाठविण्याबाबत.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास येते की, सेवानिवृत्त कर्मचा-याचे भनिनि अंतिम प्रदानाची प्रकरणे तसेच निवृत्ती वेतनाचे व EDLI चे प्रस्ताव त्वरीत / तातडीने पाठवले जात नाहीत. तसेच जे पाठवले जातात त्यामध्ये ही अनेक प्रकारच्या त्रुटी असतात, परिणामी त्रुटीपूतेतसाठी सदरचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयास परत पाठवावे लागतात त्यामुळे कर्मचा-यास अंतिम भनिनिची रक्कम व निवृत्ती वेतन मिळण्यास विलंब होतो. अंतिम भनिनिची प्रकरणे पाठवताना ब-याच वेळा खालील प्रकारच्या त्रुटी आढळून येतात. करीता क्षेत्रिय कार्यालयाने कर्मचा-याचे प्रस्ताव पाठवताना खालील दक्षता बाळगुन भ.नि.नि. विभागास प्रस्ताव पाठवावे.

१. भ.नि.नि. / अंतिम प्रदान व पुरक देयके आणि आगाऊ अग्रिम यांचा अर्ज Online भरलेला नसतो, करिता यापुढे फक्त Online अर्ज स्विकारले जातील, याची नोंद घ्यावी तसेच काही त्रुटी आढळल्यास हे अर्ज Online परत केले जातील त्रुटींची प्रतिपूर्ती Online पाहून करण्यात यावी त्यामुळे यापुढे हे अर्ज क्षेत्रिय कार्यालयास परतही केले जाणार नाहीत.

२. कर्मचा-याची Relive order / Termination / Resignation ची Order प्रस्तावा सोबत जोडण्यात यावी.

३. कर्मचा-याचा शेवटच्या १२ महिन्याचा भ.नि.नि. कपातीचा तक्त्यामध्ये, पगारा व्यतिरिक्त जर काही रक्कम दिली गेली असेल तर त्याची वेगळी माहिती देण्यात यावी.

४. कर्मचा-याला Excess Payment दिले गेले असेल तर (-) S form, (-) Schedule व IBA जोडलेले नसतात ते प्रस्तावास सोबत जोडण्यात यावीत.